# संपादकीय

सन्माननीय आजीव सभासद व वाचकांना सविनय प्रणाम .'नवज्योत' या आंतरविद्याशाखीय संशोधन पत्रिकेच्या चौथ्या वर्षातील पहिल्या अंकाच्या प्रस्तुतीकरणाचा आंनद होत आहे. तो केवळ आपल्या पाठबळाच्या व सहकार्याच्या जोरावरच! सतत तीन वर्ष संशोधन पत्रिकेचे कामकाज आपल्या पाठबळाच्या जोरावर सफल होवू शकले आहे.

सदर अंकामध्ये राज्यशास्त्र , अर्थशास्त्र शारीरीक शिक्षण ग्रंथालय व माहीती शास्त्र संस्कृत व कोषशास्त्र समाजशास्त्र इत्यादी विविध  विषयावर आलेल्या लेखांची मांडणी केली असून प्राध्यापक ,संशोधक विद्यार्थी  यांनी सखोल सविस्तर व विवेचनपूर्ण मांडणी विविध विषयावर केली आहे. यातून वाचकांना अभ्यासपूर्ण माहीतीचा खजीना उपलब्ध होणार असून वाचकांच्या ज्ञानात चौकस बुध्दीत निश्चीत भर पडेल.

संशोधनासाठी प्रेरणा उत्तेजन व व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे काम 'नवज्योत' ने सात्यतपूर्ण केले आहे. त्यामुळे सामाजीक पटलावर बदल घडवून आणणा-या  अभ्यासपूर्ण विषयांची या विश्वासासह सदर अंक मी आपल्या पुढे सविनय सादर करतो.

आपला

डॉ.विलास मगदूम